प्रेस नोट दि. १७/०१/२०१८

**" Transforming Maharashtra"** या प्रकल्पांतर्गत सायबर गुन्हयांविषयी जनजागृती अभियानांतर्गत कार्यशाळा आयोजित केले बाबत.

( लोहमार्ग पोलीस मुख्या.खडकी दि. १७/०१/२०१८ रोजी १०.०० ते १२.०० )

इंटरनेटने सर्वच क्षेत्रात प्रवेश केला आहे. वाढत्या इंटरनेटच्या वापराबरोबरच सायबर गुन्हेगारांनी गुन्हेगारीच्या नवनवीन पध्दती शोधून लोकांचा पैसा आणि खाजगी गोपनियता याला मोठा धोका निर्माण केला आहे. त्यांचा सामना करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस सक्षम आहे, परंतु यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाच्या **" Transforming Maharashtra"** या कार्यक्रमांतर्गत मा.पोलीस महासंचालक, म.राज्य, मुंबई यांनी सायबर गुन्हयांविषयी जनजागृती अभियान राबविण्याचे निश्चित केले आहे. त्यास अनुसरून पुणे लोहमार्ग पोलीस जिल्हयात दि. १७/०१/२०१८ रोजी १०.३० ते १३.३० या वेळेत लोहमार्ग पोलीस मुख्यालय खडकी येथील सभागृहात आयोजित करण्यात आले. सदर कार्यक्रमामध्ये अॅक्सेस बॅंकेचे अधिकारी (१) श्री. अशोक जॉन, ऑडीटर, अॅक्सेस बॅंक, मुंबई (२) श्री. प्रसाद गायकवाड, सॅलरी डिव्हीजन, अॅक्सेस बॅंक पुणे शाखा. सायबर सेल पुणे शहर येथील श्री. सागर पालबांडे सहा.पोलीस निरीक्षक सायबर सेल, पुणे शहर. यांचेकडून सायबर गुन्हयांची ओळख, सायबर गुन्हयांचे प्रकार, सोशल मिडीया – फेसबुक, वॉट्सअॅप, ट्विटर, बॅंकींग व इन्शुरन्स संदर्भातील गुन्हे, सायबर गुन्हयांचे प्रकार, सायबर गुन्हा घडल्यानंतर काय कराल?, सायबर गुन्हे रोखण्याच्या उपाययोजना, नागरिकांची कर्तव्ये बाबत मोलाचे मार्गदर्शन लाभले.

सदर जनजागृती कार्यक्रमाकरीता १) श्री. व्ही. पी. मोरे उप प्राचार्य, टि.जे. महाविद्यालय, खडकी, पुणे. २) श्रीमती. शुभांगी पाटील प्राध्यापक, टि.जे. महाविद्यालय, खडकी, पुणे. टि. जे. महाविद्यालय, खडकी पुणे येथील विद्याथी/विद्यार्थीनी, पोलीस मित्र, स्थानिक नागरिक व पुणे लोहमार्ग पोलीस अधिकारी व कर्मचारी असे एकुण १६७ जण उपस्थित होते.

सदर जनजागृती कार्यक्रम मा.पोलीस अधीक्षक प्रभाकर बुधवंत यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. सदर कार्यक्रमामध्ये मा.अपर पोलीस अधीक्षक, तुषार पाटील, श्री. नंदकुमार घोरपडे उप विभागीय पोलीस अधिकारी, लोहमार्ग विभाग पुणे, श्री. एन.एस. भोसले उप विभागीय पोलीस अधिकारी लोहमार्ग विभाग, सोलापुर, पोलीस निरीक्षक खंडाळे, मौला सय्यद, बावीस्कर, चंद्रकांत भोसले, सहा.पोलीस निरीक्षक समाधान पवार, पोलीस उप निरीक्षक मकासरे हे उपस्थित होते व अनिल दबडे पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, लोहमार्ग पुणे यांनी सदर कार्यक्रमाची प्रस्तावना व आभार प्रदर्शन केले.